
# तिफण

वर्ष : १३ वे । अंक १ला । एप्रिल-मे-जून - २०२२



कुळवाडीभूषण

## छत्रपती शिवाजी महाराज

**विशेषांक**

| | | |
|---|---|---|
| १६. | छत्रपती शिवाजी महाराज – तर्कशुद्ध आणि सर्जनशील व्यक्तिमत्त्व<br>- डॉ. महेश भास्कर व डॉ. शिरीष गवळी | ६३ - ६७ |
| १७. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- डॉ. गणेश शिंदे व डॉ. लहू घोरपडे | ६८ - ७० |
| १८. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- सुशीला लक्ष्मण जगधने | ७१ - ७२ |
| १९. | छत्रपती शिवाजी महाराजांचा धार्मिक दृष्टिकोन : चिकित्सक मांडणी<br>- डॉ. विकास मोहन सरनाईक | ७३ - ७६ |
| २०. | शिवरायांचे आरमार आणि दूरदृष्टी<br>- डॉ. श्वेता बा. चौधारे | ७७ - ७९ |
| २१. | शिवकालीन भाषा व लेखनपद्धती<br>- डॉ. सायली आचार्य | ८० - ८४ |
| २२. | मराठी कादंबरी व ग्रंथांमध्ये आलेले छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचे संदर्भ - डॉ. सखाराम डाखोरे | ८५ - ८८ |
| २३. | मराठी कवितेत शिवाजी महाराजांचे चित्रण<br>- योगिता चोडणकर | ८९ - ९३ |
| २४. | शिवकालीन अर्थव्यवस्था : एक अभ्यास<br>- डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे व डॉ. राजाभाऊ गायकवाड | ९४ - ९६ |
| २५. | स्वराज्याचे अधिष्ठान : मुलकी शासनव्यवस्था<br>- अविनाश सुदाम भालेराव | ९७ - १०० |
| २६. | शिवरायांचा स्त्रीविषयक क्रांतिकारी धोरण<br>- शहेनाज देशमुख | १०१ - १०४ |
| २७. | सभासद बखर : महापुरुषांच्या जीवनाच्या उज्ज्वल दीप्तीमध्ये शोकांतिकेची एक अनाकलनीय किनार - कृष्णा रतन बनसोडे | १०५ - १०८ |
| २८. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- किशोर शेषराव चौरे | १०९ - १११ |
| २९. | महात्मा जोतिबा फुले यांच्या पोवाड्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तित्व<br>- डॉ. युवराज धबडगे व नागेश बोंतेवाड | ११२ - ११५ |
| ३०. | छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार आणि देशातील आजच्या लोकशाहीची झालेली अवस्था - ईश्वर रावसाहेब आडसूळ | ११६ - ११९ |
| ३१. | छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती<br>- डॉ. सुषमा देशपांडे व कविश्री देशमुख | १२० - १२३ |

# शिवरायांचे स्त्रीविषयक क्रांतिकारी धोरण

- प्रा. शहेनाज देशमुख

हिंदी विभाग, कला, वणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सोनई. ता. नेवासा. जि. अहमदनगर

ई-मेल : anisadeshmukh5@gmail.com. मो. ९४०३९०५३३०

ज्यांनी स्त्रियांचा सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी व उंचावण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले, असे अनेक संत, समाजसुधारक महाराष्ट्रात होऊन गेले; परंतु याची सुरुवात पावणेचारशे वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजीराजांनी केली होती. शिवाजीराजे मध्ययुगीन काळातील पहिले असे सत्ताधीश आहेत. ज्यांनी स्त्रियांच्या दैन्यावस्थेला आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलली. त्यांनी स्वत:च्या मातोश्रीला सती जाण्यापासून परावृत्त केले, ही त्या काळातील सामाजिक क्रांतीच होती. शिवाजीराजांचा जन्म सरंजामशाहीत झाला; परंतु त्यांनी स्वराज्याचे स्वप्न पाहिले व स्वकर्तृत्वावर ते उभे केले. त्यांनी मराठी मनात अस्मिता निर्माण केली. राष्ट्रउभारणीत त्यांनी अठरापगड जातींना सामावून घेतले; परंतु सर्वांत महत्त्वाचे कार्य म्हणजे स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी केलेल्या सुधारणा, नियम आणि उचललेली कठोर पावले. त्यांचे हे पाऊल म्हणजे 'स्त्रीमुक्ती'साठी केलेली क्रांतीच होती. हजारो वर्षांपासून या प्रथा-परंपरांना धक्का लावण्याची हिंमत कोणी करू शकले नव्हते, ते राजांनी करून दाखवले. शिवरायांच्या मनात स्त्री जातीबद्दल उच्चप्रतीचा मान-सन्मान होता, हे त्यांच्या कृतीतून वेळोवेळी जगापुढे आले. म्हणूनच त्यांच्याविषयी सर्व जाती-धर्मांत आजही आदर दिसून येतो व तो पुढेही तसाच राहील. शिवरायांनी सर्व जाती-धर्मांना समान वागणूक दिली. अठरापगड जाती त्यांनी भगव्या झेंड्याखाली गोळा केल्या व सर्वांना स्वराज्य उभारण्यात सहभागी होण्याची संधी दिली. त्यांनी जातिभेद बाजूला सारून पराक्रमाला राष्ट्रहितासाठी वापरले. मध्ययुगीन काळात स्त्रियांना 'दास्यत्वा'साठी गुलाम म्हणून वापरले जाई. त्यांची खरेदी-विक्री होई. स्त्रीविटंबना, मालकी हे सर्रास चाले. या गोष्टींवर राजांनी बंदी आणली. शिवाजीराजांचे स्त्रीविषयक धोरण अत्यंत आदराचे होते. स्त्री जातीचा आदर त्यांच्या रक्तातच भिनला होता. त्यांचे जीवन अचंबित करणारे आहे. सरंजामशाहीत त्यांचे वर्तन आजच्या काळाशी सुसंगत वाटते. मातोश्री जिजाबाई त्यांच्या पहिल्या गुरू होत्या. त्यांच्या शिकवणीतून शिवरायांचे व्यक्तिमत्त्व आकार घेत गेले असावे. बाल मनावर केलेले संस्कार दूरगामी परिणाम करणारे ठरत असतात. जिजाऊंनी बाल शिवबाला स्त्री जातीच्या सन्मानाचे बाळकडू पाजले होते. जिजाऊंनी बाल शिवबाला दया, बुद्धी, आदर, उदार अंत:करण, न्यायशीलता यांचे बाळकडू दिले. म्हणून परस्त्रीस मातेसमान लेखणारा व शत्रूच्या स्त्रियांचा सन्मान करणारा हा युगपुरुष आपल्या देशात आजही प्रत्येकाच्या हृदयात वास करतो. ते खऱ्याअर्थाने रयतेचा राजा होते. रक्षणकर्ते होते. सैन्याला राजांचे सक्त आदेश होते. त्या काळात स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन चांगला नव्हता. अशा समाजात शिवाजी महाराजानी क्रांती घडवून आणली. त्या काळात शिवाजी महाराजांनी स्त्रियांना समाजामध्ये योग्य स्थान मिळवून देण्यासाठी आपल्या सैन्याला काही नियम पाळावयास लावले होते. ते खालीलप्रमाणे -

- लष्करात बायको व बटकीण, कलावंतीण नसावी. जो बाळगील त्याची गर्दन मारावी.
- परमुलखात पोरे बायका न धरावी.
- गाई न धरावी.'

यावरून असे लक्षात येते की, शिवाजी महाराजांच्या राज्यात स्त्रियांचा व जनावरांचादेखील विचार केला जात असे. शिवाजी महाराजांना स्त्रियांविषयी जो आदर होता तो त्यांच्या प्रवृत्तीतून नेहमी निदर्शनास येत असे. स्त्रियांना मोहिमेवर आणू

नये. त्यांना युद्धात पकडू नये. स्त्रीसंबंधी गुन्ह्याला क्षमा नव्हतीच व कठोर शिक्षा होती. मग तो कुणीही असो. साधा शिपाई, वतनदार, किल्लेदार, कुणालाही माफी नव्हती. हात-पाय तोडणे, देहदंड, डोळे काढणे आदी शिक्षा दिल्या जात. ज्या काळात युद्धामध्ये हरल्यानंतर शत्रूच्या स्त्रियांची विटंबना केली जाई. स्त्रियांना भेटवस्तू म्हणून दिले जाई. त्यांचे आर्थिक व राजकीय शोषण कल्पनेपलीकडे गेले होते. युद्धात पकडल्या गेलेल्या स्त्रियांना बळजबरीने जनानखान्यात कोंबले जाई किंवा लग्न लावले जाई. तहामध्ये स्त्रियांची मागणी होई. गावाशेजारी लष्करी छावणी पडली की, लोक जंगलाकडे पळून जात. सुना-लेकींच्या अब्रूरक्षणासाठी त्यांना जंगलामध्ये लपवले जाई. प्रजेचे रक्षकच त्यांचे भक्षक बनले होते. त्या काळात शिवाजीराजे स्त्रीरक्षक होते. त्यांनी स्त्रीजातीला संरक्षण दिले होते. राजांनी स्त्रीविषयक जे धोरण आखले, ते अमलातदेखील आणले. आई जिजाऊंनी जे बाळकडू लहानपणी शिवाजी महाराजांना दिले होते, हे त्याचेच फलित होते. शिवाजी महाराज एखाद्या युद्धाला जाताना प्रथम आपल्या आईसाहेबांचे दर्शन घेत आणि नंतरच कोणत्याही कामाला आरंभ करत. त्याचबरोबर एखाद्या मोहिमेवर जाताना आपल्या राज्याची संपूर्ण जबाबदारी आई जिजाऊंवर सोपवत असत. यावरून लक्षात येते की, त्यांच्या नजरेत स्त्रियादेखील उत्तम प्रकारे राज्य सांभाळू शकतात, याची त्यांना चांगल्याप्रकारे जाणीव होती. म्हणून की काय पण ते एखादी मोहीम आखताना नेहमी आईसाहेबांचा सल्ला विचारात घेत असत. शिवाजी महाराज हे स्त्रियांसाठी क्रांती घडवून आणणारे राजे होते. शहाजीराजांच्या मृत्यूची बातमी जेव्हा जिजाऊंना कळाली तेव्हा त्या सती जाण्यासाठी तयार झाल्या. त्यावेळी शिवाजी महाराज सुरतमध्ये होते; पण त्यांना ही बातमी समजली की आईसाहेब सती जाणार आहेत, तेव्हा त्यांनी आईसाहेबांना सती जाण्यापासून प्रवृत्त केले. खऱ्याअर्थाने त्यांनी त्या काळातील एका अनिष्ट प्रथेविरुद्ध आवाज उठवला. इ.स. १६३८ स्वराज्याची शपथ घेऊन तीन वर्षे पूर्ण झाली होती. तेव्हा महाराज १८ वर्षांचे होते. त्यांचे सहकारी आबाजी सुखदेव हे कुशल सेनापती व महाराजांचे मित्र होते. त्यावेळी ठाणे प्रांताला विशेष महत्त्व होते. म्हणून आबाजींच्या नेतृत्वाखाली सेना ठाणे प्रांतातील कल्याण शहरावर चालून गेली. कल्याण हे शहर त्या काळात एक मोठी बाजारपेठ होती आणि तिथला सुभेदार अहमद होता. आबाजींने त्याचा पराभव करून खूप मोठ्या प्रमाणात सोने, चांदी व मौल्यवान वस्तूंची लूट केली. त्याचबरोबर वीर आबाजी आणि मोरोपंत पिंगळे यांनी येताना सुभेदार अहमदच्या सुनेला बंदी बनवले. याची महाराजांना कल्पना नव्हती. जेव्हा महाराजांसमोर सुभेदाराच्या सुनेला आणले जाते तेव्हा ते वीर आबाजी आणि मोरोपंत पिंगळे यांना समजावून सांगतात की परस्त्री ही माझ्यासाठी मातेसमान आहे. ते सुभेदाराच्या सुनेला पाहून उर्दूमध्ये बोलतात की, 'माँ शिवाजी अपने सेनापती की नामाकूल हरकत पर माफी चाहते हैं। आपकी तरह मेरी माँ इतनी सुंदर होती तो हम भी सुंदर होते।' महाराजांनी तिचा उचित सन्मान करून तिला पुन्हा डोलीत बसवून रवाना केले. या प्रसंगावरून लक्षात येते की, शिवाजी महाराजांसाठी कोणत्याही जाती-धर्मातील स्त्री ही मातेसमान होती. शत्रूच्या स्त्रियांचादेखील त्यांनी आदर केला.

शिवाजी महाराज न्यायनिवडा करताना त्यांच्यासमोर कोणी श्रीमंत किंवा गरीब नव्हता. स्त्रियांच्या बाबतीत शिक्षा करताना सर्वांना समान शिक्षा होती. एकदा पुण्याजवळ बाबाजी भिकाजी गुजर नावाच्या रांझेगावाच्या पाटलाने एका स्त्रीवर अमानुष अत्याचार केला. त्यामुळे त्या स्त्रीने आत्महत्या केली. त्याने गावातील कितीतरी स्त्रियांवर अत्याचार केले होते. ही बातमी जेव्हा महाराजांना समजली, तेव्हा महाराजांनी त्याचे हात व पाय तोडण्याचे आदेश देऊन त्याचा चौरंग बनवला. त्यांच्या आदेशाची अंमलबजावणी तंतोतंत झाली. या शिक्षेच्या परिणामस्वरूप कधी कोणी स्त्रियांवर अत्याचार केले नाहीत, असे असंख्य पुरावे इतिहास देतो.

शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयी दृष्टिकोन इतका उदार होता की, त्यांनी समाजातील स्त्रियांचाच विचार केला नाही तर आपल्या परिवारातील स्त्रियांच्या बाबतीतदेखील तो अमलात आणला. शिवाजी महाराजांनी आपली सून संभाजी महाराजांची पत्नी येसूबाई यांना स्वराज्यमधील सर्वात मोठे कुलमुखत्यार हे पद बहाल केले होते. त्या काळात हे पद खूप महत्त्वपूर्ण मानले जायचे आणि महाराजांनी हे पद एका स्त्रीकडे दिले होते. महाराजांच्या मते स्त्री जर कर्तृत्ववान असेल आणि तिच्यात निर्णय घेण्याची क्षमता असेल तर तिला योग्य स्थान दिले पाहिजे. त्याचबरोबर त्यांनी आपली दुसरी सून ताराबाई यांच्यातील सुप्त गुण ओळखून त्यांना तलवारबाजी करण्याचे अधिकार दिले. शिवाजी महाराजांच्या याच निर्णयामुळे

नतरच्या काळात ताराबाईंनी शत्रूला सळो की पळो करून सोडले आणि स्वराज्याचे रक्षण केले. ताराबाईंनी शत्रूच्या अंगाला शहारे आणले. रायगडाला वेढा पडल्यावर प्रसंगी स्त्रियांनी आपल्या हातात तलवारी घेतल्या.

किल्ले रायगडाच्या पायथ्याशी राहणाऱ्या हिरकणीची कथाही अशीच आहे. हिरकणी आपल्या तहानुल्या बाळासाठी रायगडाचे दार बंद झाल्यावर अवघड असा बुरूज उतरून खाली येते. रक्तबंबाळ अवस्थेत घरी जाऊन झोपते आणि दुसऱ्या दिवशी ती पुन्हा रायगडावर दूध आणि लोणी विकण्यासाठी जाते. तेव्हा द्वारपाल विचार करतो की, काल जेव्हा ही आली होती तेव्हा रायगडाचे दार बंद झाले होते. ही बाहेर आली कशी? ती बातमी महाराजांपर्यंत गेल्यावर महाराज हिरकणीला आपल्या दरबारात बोलावून घेऊन साडी-चोळी देऊन तिचा सन्मान करतात. शिवाजी महाराज तिला म्हणाले की, जर स्वराज्यात तुमच्यासारख्या स्त्रिया आपल्या तान्हुल्या मुलासाठी अशक्य असा बुरूज उतरू शकतात, तर ती स्वराज्यासाठी काहीपण करेल. म्हणून महाराजांनी तिचा सन्मान केला व त्या बुरूजाला 'हिरकणी बुरूज' हे नाव दिले. शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयी विचार वेगवेगळ्या प्रसंगांतून नेहमी पाहायला मिळतो. आज संपूर्ण जगात स्त्रियांना जो आदर मिळाला नाही तो महाराजांच्या राज्यात दिला गेला होता.

गोष्ट डिसेंबर १६७६ मधील आहे. महाराज संपूर्ण दक्षिण जिंकण्यासाठी रायगडावरून निघाले. दक्षिणेतील बऱ्याच छोट्या-मोठ्या राजांनी त्यांचे मांडलिकत्व स्वीकारले. बरीच साम्राज्ये त्यांच्या आधिपत्याखाली आले; परंतु बेळगावजवळ बेलहोंगलच्या बेलवाडीचा राजा ईश प्रभूने त्यांचे मांडलिकत्व स्वीकारले नाही. तो युद्धासाठी तयार झाला. त्या मोहिमेचे सेनापती धानजी जाधव होते. युद्धात ईश प्रभू जखमी होऊन मरण पावला. त्याची पत्नी मल्लमादेवी ही शूरवीर लढवय्या स्त्री होती. युद्धकलेत पारंगत होती. आपल्या पतीच्या मृत्यूनंतर ती शरण न जाता आपल्या पतीच्या इच्छेप्रमाणे तिने हातात तलवार घेऊन २,००० स्त्रियांची व ३,००० पुरुषांची फौज घेऊन अचानक मराठ्यांवर आक्रमण केले. मल्लमादेवीने आपली जनावारे तसेच आपले सर्व नुकसान भरून काढले. त्याचबरोबर मराठ्यांचे २०० गुरे आपल्या ताब्यात घेतले. त्यावेळी गुरांची छावणी सांभाळण्यासाठी सखूजी गायकवाडची नेमणूक केली गेली होती. एवढ्या मोठ्या प्रमाणात स्त्रिया चालून आल्याने तो गोंधळलेल्या अवस्थेत होता. सखूजी गायकवाडने सर्व जनावरे सोडून आणण्याची जबाबदारी स्वीकारली व तो पुन्हा बेळवाडीवर चाल करून गेला. खूप प्रयत्न केल्यानंतर त्याला गढीचे दार उघडण्यात यश आले. या वेळी त्याने व्यक्तिगत रागाखातर मल्लमादेवीच्या अब्रूवर हात टाकला. ही खूप मोठी चूक त्याच्या हातून घडली. मल्लमादेवीला बंदी बनवून महाराजांसमोर हजर केले. जेव्हा महाराजांनी एका स्त्रीला बंदी अवस्थेत पाहिले तर मल्लमादेवीला मुक्त करण्याचे आदेश त्यांनी दिले. महाराज मल्लमादेवीला म्हणाले की, हे सर्व आपल्या सर्वांसाठी करत आहोत. आपण असे का वागल्या? यावर मल्लमादेवीला राग आला व त्या म्हणाल्या की, आपल्या राज्यात जर स्त्री सुरक्षित नसेल तर तुमच्यात आणि मुघलांत काय अंतर? मल्लमाचे हे वाक्य महाराजांना जिव्हारी लागले. तेव्हा मल्लामाने आपल्याबरोबर घडलेला सर्व प्रकार महाराजाना सांगितला. सखूजी गायकवाडला वाटले की, आपण महाराजांचे मेव्हणे आहोत, म्हणून महाराज आपल्याला शिक्षा करणार नाहीत; परंतु घडले वेगळेच. महाराजांनी त्याचे दोन्ही डोळे काढले व त्याला कैदेत टाकले. मल्लमाची माफी मागितली व तिला सावित्री हे नाव दिले. तिच्या सव्वावर्षाच्या मुलाला दूधभात म्हणून दोन गावे इनाम दिली व तिला आपली बहीण मानून तिचा मानसन्मान केला. मल्लमाने शिवाजी महाराजांच्या हयातीत बेळवाडी या ठिकाणी यादववाडी गावी शिवाजी महाराजांचे शिल्प बनवले. ते आजही या ठिकाणी आहे. या गोष्टीचा उल्लेख सभासद बखर, ९१ कलमी बखर, तारीख-ए-शिवाजी, शिवाजी मल्लभाजी समारोत्सव यामध्ये मिळतो.



यादववाडी येथील शिवाजी महाराजांचे शिल्प

शिवाजी महाराजांच्या स्वराज्याला स्वकीयांचा विरोध

होता. प्रसंगी रक्तसंबंध जोडून किंवा तलवारीच्या धाकावर स्वराज्य उभे केले. विरोधकांनाही स्वराज्यात सामील करून घेतले. त्यांनी आपल्या सैन्यापुढे व्यक्तिगत नीतिमत्तेचे, चारित्र्याचे उदाहरण ठेवले. साम्राज्य उभे करणे वेगळे व समाज घडविणे वेगळे. त्यांनी समाजात तत्त्वांची पेरणी केली. वाणीने, कृतीने ध्येयवाद शिकवला. शिवछत्रपतींचे स्त्रीविषयक धोरण म्हणजे त्यांच्या उच्च नीतिमत्तेचा पुरावा होता. आजूबाजूला घडणाऱ्या महिलाविरोधी गुन्ह्यांच्या घटना पाहिल्या की, शिवरायांच्या विचारांची कधी नव्हे ते एवढी गरज असल्याचे जाणवते. स्त्री हा कुटुंबाचा प्रमुख घटक आहे. प्रत्येक मातेने आपल्या मुलाला वाढवताना आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या स्त्रियांविषयी आदर भावना वाढीस लावणे गरजेचे आहे. परिणामी, पुढे तो स्वतःची पत्नी व इतर स्त्रियांचा मानसन्मान करेल. त्यांच्याविषयी आदराची भावना ठेवील. त्यातून स्त्रियांवरील अन्यायाचे प्रमाण काही प्रमाणात का होईना घटेल. शिवरायांचे चरित्र सर्वांना भुरळ घालणारे आहे. भारत वर्षात अनेक पराक्रमी राजे होऊन गेलेत; परंतु महाराजांइतकी लोकप्रियता क्वचितच कोणाला मिळाली असेल. शूरवीर, राष्ट्रभक्त, चतुर नीतिमान, विषमतेला गाडणारा समाजसुधारक, शेतकऱ्यांचीही काळजी घेणारा कर्तव्यदक्ष राजा, असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. त्यांची नेहमीच उजळणी होताना दिसते. या त्यांच्या गुणांवर आजपर्यंत खूप लिखाण झाले आहे. तथापि, त्यांनी स्त्रियांविषयी जे क्रांतिकारी धोरण ठरविले आणि अमलात आणले, त्याबाबत फारशी चर्चा होताना दिसत नाही. स्वराज्याचे रूपांतर सुराज्यात करावयाचे असेल, तर महाराजांच्या या गुणांची चर्चा करण्याची व तो समाजात रुजविण्याची खरी गरज आहे.

**संदर्भ सूची -**


१. 'मराठ्यांचा इतिहास - मराठा सत्तेचा उदय आणि अस्त', डॉ. बी. जी. शहा आणि डॉ. एस. डी. खैरनार, प्रशांत पब्लिकेशन, आवृत्ती आगस्ट २०२० - पृष्ठ क्र. १४२
२. 'यादवाडमधील शिवाजी महाराजांच्या शिल्पाचे छायाचित्र' - https://images.app.goo.gl/FrNWKnaiF3
३. 'सभासद बखर' - कृष्णाजी आनंत सभासद
४. 'तारीख-ए-शिवाजी'


◆◆◆◆◆

